| | जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड | |
|---|---|---|
| सत्यमेव जयते | वेबसाईटः- www.nanded.gov.in | ई- मेलः- laoconanded@gmail.com |
| | दुरध्वनी क्रमांकः-02462-235077/244651 | फॅक्स क्रमांकः- 02462- 238500 |
| | शाखाः- भूसंपादन समन्वय | क्रमांक 2016/आरबी/डेस्क-3/भूसं/सिआर- 35 |

**दिनांक** 28.09.2017

**प्रति,**
**उपविभागीय अधिकारी, तथा**
**भूसंपादन अधिकारी, किनवट**

**विषय - भूसंपादन प्रस्ताव - मौजे धानोरा (शिख) ता. किनवट जि. नांदेड येथील कलम 19 च्या अधिसूचनेस 12 महिण्याची मुदतवाढ देण्याबाबत.**

**संदर्भ -** आपले कार्यालयीन पत्र जा.क्रं.2014/भूसंपादन/नि.पै.प्र./धा.शि./सिआर- 43 दिनांक 14.09.2017

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रान्वये भूसंपादन कायदा भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 नुसार भूसंपादन प्रकरणात कलम 19 ची अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासुन बारा महिन्याच्या आत कलम 23 अन्वये निवाडा होणे आवश्यक आहे. परंतु उक्त प्रकरणात मुल्यांकन अहवाल अप्राप्त असल्यामुळे प्रकरणात निवाडा जाहीर करता आला नाही. करिता प्रकरणात समुचित शासनाला बारा महिन्याचा कालावधी वाढवुन देण्याची आपण विनंती केलेली आहे.

संचिकेची तपासणी केली असता कलम 19 च्या अधिसुचनेस या कार्यालयाने दिनांक 28.09.2016 रोजी मान्यता दिली आहे. करिता प्रकणात 12 महिण्याची मुदतवाढ देण्यात येत असून कळविण्यात येते की, प्रकरणात संबंधीताकडून तात्काळ मुल्यांकन अहवाल प्राप्त करुन घ्यावा व प्रकरण व्यपगत होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. देण्यात आलेली मुदतवाढ संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

**जिल्हाधिकारी नांदेड**

**प्रतिलिपी:**

उपवनसंरक्षक नांदेड, जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी, नांदेड व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर यांना देवुन कळविण्यात येते की, सदरील प्रकरणात तात्काळ मुल्यांकन अहवाल उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी किनवट यांच्या कार्यालयास सादर करावा.

**जिल्हाधिकारी नांदेड**